# प्रेसनोट

## प्रादेशिक परिवहन विभाग नागपूर ग्रामीण येथील मोटार वाहन निरीक्षक यांचेविरूध्द ACB नागपूरने केली यशस्वी सापळा कारवाई

यातील तक्रारदार हे ट्रक चालक मालक असून त्यांना महाराष्ट्र-मध्यप्रदेश सिमा तपासणी नाका खुर्सापार येथील आरटीओ चेकपोस्ट येथून वाहन पास (एन्ट्री) करण्याकरिता तेथील अधिकारी व त्यांचे अखत्यारित खाजगी इमस यांनी ५००/- रू. लाचेची मागणी करून स्विकारली होती. तक्रारदार यांना परत सिमा तपासणी नाका खुर्सापार येथुन ट्रक पास (एन्ट्री) करणे असल्याने त्यांना आरटीओ चेक पोस्टवर लाचेची मागणी होण्याची खात्री असल्याने त्यांनी दिनाक १०/०६/२०२६ रोजी ACB नागपूर कार्यालयात प्रत्यक्ष येवुन तक्रार दिली.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ११/०६/२०२६ रोजी लाच मागणी पडताळणी दरम्यान महाराष्ट्र-मध्यप्रदेश सिमा तपासणी नाका खुर्सापार येथील आरटीओ चेकपोस्ट येथून ट्रक पास (एन्ट्री) करण्याकरिता आरोपी लोकसेवक श्री. साजन शालिग्रामजी शेंडे, वय ५० वर्ष, मोटर वाहन निरीक्षक, प्रादेशिक परिवहन विभाग, नागपुर ग्रामीण हे कर्तव्यावर हजर असतांना खाजगी इसम श्री. प्रवीण बाबुराव गायधने, वय ५० वर्ष यांनी तक्रारदार यांना ५००/- रुपये लाचेची मागणी केली.

सापळा कारवाई दरम्यान महाराष्ट्र-मध्यप्रदेश सिमा तपासणी नाका खुर्सापार येथील आरटीओ चेक पोस्टवर ट्रक पास (एन्ट्री) करण्याकरिता खाजगी इसम श्री. प्रवीण बाबुराव गायधने यांनी ५००/- रुपये लाच स्विकारली. त्यास आरोपी लोकसेवक श्री. साजन शालिग्रामजी शेंडे, मोटर वाहन निरीक्षक यांनी प्रोत्साहन दिल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले. याबाबत पोलीस स्टेशन केळवद, नागपूर ग्रामीण येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम कलम ७ अ, १२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई ही डॉ. दिंगबर प्रधान, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर, श्रीमती माधुरी बाविस्कर, अपर पोलीस अधीक्षक व श्री. विजय माहुलकर, अपर पोलीस अधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली, श्रीमती भारती गुरनुले, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि., नागपूर यांचे पर्यवेक्षणाखाली सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. मयुर चौरसिया, सापळा पथक श्री. राजकिरण येवले, पोलीस निरीक्षक, पोहवा योगेश साधनकर, मपोहवा कांचन गुलबासे, पोअं. उपेंद्र आकोतकर, सचिन किन्हेकर, चालक पोहवा विलास इंगळे सर्व नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर यांनी केलेली आहे.

नागपूर जिल्हयातील सर्व नागरिकांना आव्हान करण्यात येते की, कोणत्याही शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसम (ऐजंट) यांनी कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशिर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर येथे संपर्क साधावा. तक्रारदारांच्या तक्रारीवर तातडीने कारवाई करण्यात येईल व तक्रारदार यांचे सापळा कारवाईत वापरण्यात आलेली रक्कम ही १ महिण्याचे आंत परत केल्या जाईल. तसेच तक्रारदारांचे शासकीय विभागात अडकलेले वैध कामही पुर्ण करून दिले जाईल.

**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथे खालील क्रमांकावर संपर्क साधावा**

१. पोलीस अधीक्षक कार्यालय दुरध्वणी क्र. ०७१२-२५६१५२०,
२. टोल फ्री क्रमांक : १०६४ / व्हॉटसअॅप क्र. ९०६७६७१०६४
३. डॉ. दिगंबर प्रधान, पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर मो.क्र. ९९२३१८५५६६
४. श्रीमती माधुरी बाविस्कर, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर मो.क्र. ७०३८४३६४४१
५. श्री. विजय माहुलकर, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर मो.क्र. ९९२३१४२५६९
६. श्री. राजीव कर्मलवार, पोलीस निरीक्षक, वाचक लाप्रवि नागपूर मो.क्र. ९०२१४५२७६०